नमुना - 1

( नियम 11 पहा )

जिल्हाधिकारी, जिल्हा अहमदनगर यांचे कार्यालय

क्रं कावि/ग्रापं/कार्या8अ/ ८९✓/2019
दिनांक 03/06/2019

महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणुक घेणे ) नियम 1962 मधील नियम 11, पोटनियम (1-अ) या अन्वये प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मी राहूल व्दिवेदी, जिल्हाधिकारी अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यादवारे या सोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ 1 मध्ये निर्दिष्ट करणेत आलेल्या मतदार विभागातर्फे ( ज्यांचा यात यापुढे ' संबंधीत मतदार विभाग ' असा उल्लेख करणेत आलेला आहे) करण्यात येणा-या निवडणुकीच्या संबंधात, पुढील तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहे.

अ) उक्त अनुसुचीच्या स्तंभ 2 मध्ये, संबंधीत मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया संबंधीत मतदार विभागाच्या संबंधात नामनिर्देशनासाठी असलेल्या अखेरच्या तारखा व वेळा असतील.

ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 3 मध्ये, संबंधीत मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया संबंधीत विभागाच्या संबंधात नामानिर्देशनपत्राची छाननी करण्यासाठी असलेल्या तारखा व वेळा असतील.

क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 4 मध्ये, संबंधीत मतदार विभागासमोर, निर्दिष्ट केलेल्या जागा हया नामनिर्देशन करण्याच्या व त्यांची छाननी करण्याच्या जागा असतील.

ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 5 मध्ये, संबंधीत मतदार विभागासमोर निर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखा हया अहमदनगर जिल्हा परिषदेच्या निवडणुका ज्या तारखास घेण्यात येतील त्या तारखास असतील.

इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 6 मध्ये, संबंधीत मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या वेळा हया ज्या वेळांमध्ये मतदान घेण्यात येईल त्या वेळा असतील.

फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 7 मध्ये संबंधीत मतदार विभागांसमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया, मतमोजणीसाठी असलेल्या तारखा व वेळा असतील.

ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 8 मध्ये संबंधीत मतदार विभागासमोर निदिष्ट केलेल्या जागा हया, मतमोजणीसाठी असलेल्या जागा असतील.

## अनुसूची

| मतदार विभागाचे नाव | नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशन पत्र सादर करण्याची व त्यांची छाननी करण्याचे ठिकाण | आवश्यक असेल तर ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीसाठी तारीख व वेळ | मतमोजणी करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 55-बारागाव नांदूर | सोमवार दि.3 जून, 2019 ते शनिवार दि. 8 जून 2019 सकाळी 11 ते दुपारी 3 पर्यत) (बुधवार दि. 05/06/2019 रोजी सार्व.सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत) | सोमवार दि. 10 जून 2019 सकाळी 11 वाजल्यापासून | तहसिल कार्यालय राहूरी | रविवार दि.23 जून 2019 | सकाळी 7.30 ते 5.30 पर्यत | सोमवार दि. 24 जून 2019 सकाळी 10.00 | तहसिल कार्यालय राहूरी |

दिनांक- 3/06/2019
ठिकाण:- अहमदनगर

(राहूल द्विवेदी)
जिल्हाधिकारी अहमदनगर